चंद्रपूरचे तापमान देशात सर्वाधिक

४४.६ अंश सेल्सिअसची नोंद

लोकसत्ता वार्ताहर

चंद्रपूर : विदर्भात उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. गेल्या दोन दिवसांपासून चंद्रपूर जिल्ह्यात तापमानाचा पारा चांगलाच चढला आहे. सोमवारी ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्यानंतर रविवारी चंद्रपूर जिल्ह्याचे तापमान देशात सर्वाधिक नोंदवले गेले. रविवारी जिल्ह्याचे तापमान ४४.६ अंश सेल्सिअसवर पोहोचले. या हंगामातील हे सर्वोच्च तापमान ठरले आहे. तीव्र उन्हामुळे दुपारच्या सुमारास शहरातील रस्ते निर्मनुष्य होते.

रविवारी बुलढाणा वगळता विदर्भातील सर्वच जिल्ह्यांच्या तापमानाने चाळिशी ओलांडली. अकोला, अमरावती, ब्रह्मपुरी, नागपूर आणि वर्धाचे तापमान ४४ अंशांपेक्षा अधिक नोंदवले गेले.

जिल्ह्यांचे तापमान

अकोला	४४.३
अमरावती	४४.४
भंडारा	४१.४
बुलढाणा	३९.६
चंद्रपूर	४४.६
गडचिरोली	४२.६
गोंदिया	४२.२
नागपूर	४४.०
वर्धा	४४.०
वाशीम	४२.६
यवतमाळ	४३.६

बालगुन्हेगारी नियंत्रणासाठी ‘हेल्पडेस्क’

राज्यातील पाच शहरांत उपक्रम

अनिल कांबळे, लोकसत्ता

नागपूर : वाढत्या बालगुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यात ‘केअर’ नावाने पहिला उपक्रम नागपुरात राबवण्यात आला होता. आता ‘केअर’च्याच धर्तीवर राज्यभरात ‘हेल्पडेस्क’ हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी राज्यातील पाच शहरांची निवड करण्यात आली.

बाल गुन्हेगारांना मुख्य प्रवाहात आणण्यासह त्यांचे समुपदेशन करण्यासाठी राज्यातील पहिला उपक्रम नागपूर पोलिसांनी राबवला होता. तत्कालीन पोलीस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी ‘एन-कॉप्स एक्झलेन्स’ या इमारतीत ‘केअर’ (कॉऊंसिलिंग अँड रिफॉर्मेटिव्ह एज्युकेशन सेंटर) या उपक्रमाची सुरुवात केली होती. विधिसंघर्षग्रस्त बालकांना गुन्हेगारी सोडून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी येणाऱ्या अडचणी सोडवता याव्या, यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये बाल कल्याण पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. विधिसंघर्षग्रस्त बालकांनी शिक्षण घेणे आवश्यक आहे. घडलेला गुन्हा पुन्हा घडू नये, अशी स्थिती निर्माण करीत त्यांना परिवर्तनाच्या मार्गावर आणावे, पोलिसांनीही बाल गुन्हेगारांच्या नजरेने न बघता सामान्य मुलांप्रमाणे त्यांच्याकडे बघावे, हा केअर उपक्रमाचा उद्देश होता. त्याच धर्तीवर आता राज्यात हेल्पडेस्क नावाने उपक्रम सुरू करण्यात आला आहे. मुलांचे हक्क व किशोरवयीन गुन्हेगारांचे पुनर्वसन करण्यासाठी, कायदेशीर, सामाजिक, समुपदेशन सेवा पुरवण्यासाठी राज्यातील निरीक्षणगृहांमध्ये ‘हेल्पडेस्क’ स्थापन करण्यात आला आहे. हा उपक्रम सामाजिक संस्थांमार्फत राबवण्यात येणार आहे. न्यायप्रविष्ट प्रकरण असलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी किशोर न्याय संसाधन कक्ष, टाटा सामाजिक विज्ञान संस्था आणि महिला व बाल विकास विभागाकडून हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. गृहमंत्रालयाने या उपक्रमासाठी सकारात्मकता दाखवली आहे.

पुणे-ठाण्याचा समावेश

विधिसंघर्षग्रस्त बालक किंवा न्यायप्रविष्ट प्रकरण असलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी ‘हेल्पडेस्क’ काम करणार आहे. सध्या पुणे, ठाणे, लातूर, नागपूर, यवतमाळ या पाच शहरांचा या उपक्रमात समावेश आहे. यानंतर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

नागपूर पोलिसांनी २०१८ मध्येच विधिसंघर्षग्रस्त बालकांना मदत व्हावी तसेच बालगुन्हेगारीवर नियंत्रण मिळावे, या उद्देशाने ‘केअर’ उपक्रम सुरू केला होता. उपायुक्त गजानन राजमाने यांची महत्त्वाची भूमिका होती. उपक्रमामुळे जवळपास ५० टक्के बालगुन्हेगारी कमी झाली.

- डॉ. भूषणकुमार उपाध्याय, माजी पोलीस महासंचालक.

कापूस उत्पादक पर्यायी पिकांच्या शोधात

खतांचे दर आवाक्याबाहेर; अपेक्षित भाव नसल्याचा परिणाम



जळगाव : अनियमित पाऊस, बोंड अळीचे संकट, रासायनिक खतांसह कीटकनाशके, बियाणे आणि मजुरीचे आवाक्याबाहेरील दर, भाव न मिळणे यामुळे मेटाकुटीला आलेले कापूस उत्पादक पर्यायी पीक शोधत आहेत. त्यामुळे यंदाच्या खरिपात लागवड घटण्याची चिन्हे आहेत.

कपाशीचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना एकरी किमान २० ते २२ हजार रुपये खर्च सहज येतो. खर्च टप्प्याटप्प्याने होत असला तरी घरात आलेला कापूस संपूर्णपणे विकला जात नाही, तोपर्यंत शेतकऱ्याला सर्व खर्चाची तरतूद कर्ज काढून तसेच उधार व उसनवारीने करावी लागते. मात्र, अपेक्षेनुसार कापसाचे उत्पादन हाती न आल्यास तसेच योग्य बाजारभाव न मिळाल्यास शेतकऱ्यांना खर्चाचा ताळमेळ साधणे कठीण जाते.

नेमकी घट किती?

- भारतीय कापूस संघटनेच्या माहितीनुसार, २०२३-२४ मध्ये संपूर्ण देशात १२३.७०९ लाख हेक्टर क्षेत्रात तसेच महाराष्ट्रात ४२.२२२ लाख हेक्टरवर कपाशीची लागवड झाली होती.
- २०२४-२५ मध्ये देशात १० लाख ७६२ हेक्टरने घट होऊन हे क्षेत्र ११२.९४७ लाख हेक्टर इतके झाले. तर महाराष्ट्रातही एक लाख ३६२ हेक्टरने घट होऊन ४०.८६० हेक्टर क्षेत्रात कापसाची लागवड झाली.

प्रतिकूल हवामानामुळे कापसाचे उत्पादन घटले असताना, त्यास चांगला बाजारभावदेखील नाही. शेतकरी कपाशीचे पीक घेण्यासाठी इच्छुक नाहीत, ते अन्य पिकांचा विचार करू लागले आहेत.

- एस. बी. पाटील (समन्वयक, शेतकरी कृती समिती, चोपडा)

‘मौसम है आशिकाना...’ ने रिझवले

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : ‘मौसम है आशिकाना’, ‘सासों की माला में’, ‘कजरा मोहब्बतवाला’ या आणि अशा अनेक कव्वाली, गझल गीत आणि जोडीला शायरी अशी वैविध्यपूर्ण सांगीतिक मेजवानी नागपूरकरांनी सप्तकच्या कार्यक्रमात रविवारी कुलगुरू कालिदास सभागृहात अनुभवली.

रश्मी मोघे यांनी ‘मौसम है आशिकाना’ सादर करून रसिकांची मने जिंकली. याशिवाय ‘तेरी महफिल मे’, ‘दर पे आया हू’, ‘कजरा मोहब्बतवाला’, ‘रश्के कमर’, ऐ मेरे मालिक मेरे मौला’ गाणी सादर केली. उज्ज्वलने खड्या आवाजात ‘झुम बराबर झुम’ कव्वाली सादर केली. कार्यक्रमाचा समारोप ‘दमादम मस्त कलंदर’ या गाण्याने झाला.

कार्यक्रमाचे संगीत संयोजन संगीतकार आशीष मुजुमदार यांचे होते. निवेदन डॉ. समीरा गुजर-जोशी आणि समीर सामंत यांनी केले. प्रसाद जोशी, आमोद कुलकर्णी, विक्रम जोशी, निनाद सोलापूरकर, राधिका अंतूरकर व आशीष मुजुमदार यांनी गायकांना उत्तम वाद्यसंगत केली. हे सर्व पुण्याचे कलावंत खास या कार्यक्रमासाठी आले होते. प्रास्ताविक डॉ. उदय गुप्ते यांनी केले. सुधीर लातूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शाळा, रुग्णालयाच्या दुरवस्थेकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : ‘सरकारी शाळा अभियान’ नागपूरच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक निवेदन देऊन सरकारी शाळा व रुग्णालयाच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधण्यात आले.

सरकारी शाळा आणि रुग्णालयाकडे सरकार जाणीवपूर्क दुर्लक्ष करीत आहे, शिक्षणााठी गोळा केला जाणारा कर केवळ शिक्षकांच्या वेतनावर खर्च केला जातो व पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष केले जाते, असा अभियानचा आरोप आहे.

सरकारी शाळा खासगी उद्योग समूहाकडे सोपवण्याचाही अभियाने निषेध केला आहे. सरकारी शाळा रुग्णालयाच्या सर्वेक्षणासाठी १०-१५ स्वयंसेवकांना परवानगी द्यावी आणि त्यासाठी आवश्यक संसाधने करून द्यावी, अशी मागणी अभियानने केली आहे.

हिंदीसक्तीवरून एक पाऊल मागे!

हिंदीऐवजी अन्य भारतीय भाषेचा पर्याय देण्याची मुख्यमंत्र्यांची भूमिका

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : ‘राज्यात मराठीचीच सक्ती आहे. हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे म्हणता येणार नाही. हिंदीऐवजी अन्य कोणतीही भाषा शिकायची असेल, तर तसा पर्याय विद्यार्थ्यांना दिला जाईल. त्याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल,’ अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी येथे मांडली. त्यामुळे पहिलीपासून हिंदीसक्ती करण्याच्या निर्णयावर सरकारने एक पाऊल मागे घेण्याचे सूतोवाच केले आहे.

भारतीय विकास परिषदेच्या कार्यक्रमासाठी आले असताना, फडणवीस यांना हिंदीसक्ती मागे घ्यावी, याबाबत भाषा सल्लागार समितीने दिलेल्या पत्राबाबत पत्रकारांनी विचारणा केली. त्या वेळी त्यांनी ही भूमिका मांडली. ‘इंग्रजी भाषेचे गोडवे गाताना हिंदीसारखी भारतीय भाषा लांबची का वाटते, याचाही विचार झाला पाहिजे,’ असा चिमटाही त्यांनी काढला.

मुख्यमंत्री म्हणाले, ‘मराठीऐवजी हिंदी भाषा अनिवार्य केलेली नाही. नव्या शैक्षणिक धोरणात तीन भाषा अनिवार्य आहेत. त्यात दोन भारतीय भाषा आणि इंग्रजी असा नियम आहे. राज्यात मराठी सक्तीची आहे. दुसरी भाषा भारताबाहेरची घेता येणार नाही. मंत्र्यांच्या समितीनेही दुसरी भाषा हिंदी असावी, अशी शिफारस केली आहे. हिंदी विषयाचे शिक्षक उपलब्ध आहेत. अन्य भाषांसाठी पुरेसे शिक्षक नाहीत. त्यामुळेच ही शिफारस करण्यात आली होती. मल्याळम्, तमिळ, गुजराती किंवा अन्य दुसरी भाषा स्वीकारली असती, तर त्याचे शिक्षक उपलब्ध होणार नाहीत. मात्र, हिंदीऐवजी अन्य दुसरी भाषा शिकायची असेल, तर विद्यार्थ्यांना तशी संधी दिली जाईल. मात्र, त्यासाठी किमान २० विद्यार्थी असणे बंधनकारक असेल. तरच, त्यासाठी शिक्षक देता येतील. वीसपेक्षा कमी विद्यार्थी असतील, तर अन्य पर्यायांच्या माध्यमातून त्यांना भाषा शिक्षण देता येईल. त्याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल,’ असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

‘भाजप लोकशाही मानणारा पक्ष’

‘सध्या मंडल नेमणुका सुरू आहेत. त्यानंतर जिल्हा आणि राज्य स्तरावरील नेमणुका होतील. भाजप हा लोकशाही मानणारा पक्ष आहे,’ असे पक्षांतर्गत नेमणुकांसंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले. ‘राज्यातील पाणीटंचाईसंदर्भातील निर्णयाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पाणीटंचाईच्या झळा टाळण्यासाठी नियोजन सुरू करण्यात आले आहे,’ असेही त्यांनी सांगितले.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहिल्यानगर

जाहीर ई-निविदा सुचना क्रमांक अहिल्यानगर - 01/2025-2026

अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना-II (Research and Development) अंतर्गत रस्ते दर्जोन्नती व ५ वर्ष देखभाल व दुरूस्तीच्या १ पॅकेज १ काम एकूण अंदाजित किंमत रक्कम रू. ३२९.५० लक्ष ई निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामांची सविस्तर ई निविदा https://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर **दि. 21/04/2025** पासुन उपलब्ध होईल.

ई-निविदा सुचना क्र.	एकुण कामे	एकत्रित अंदाजित किंमत
01/2025-2026	1 काम	रू. 329.50 लक्ष

सही/-
(अ.भा.चव्हाण)
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहिल्यानगर

Sitara A SEWA INITIATIVE

सेवा गृह ऋण लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय: बिल्डिंग क्र. 8, टॉवर सी, आठवा मजला, डीएलएफ सायबर सिटी, गुरुग्राम 122002.

मागणी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3(1) सह वाचण्यात येणारया सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत.

निम्नस्वाक्षरीकार हे सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत **सेवा गृह ऋण लिमिटेड** चे प्राधिकृत अधिकारी आहेत. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना जारी केल्या ज्यात पुढील कर्जदारांना (''सदर कर्जदार'') जारी करण्यात आलेल्या संबंधित मागणी सूचनांमध्ये नमूद तसेच खाली नमूद रकमांची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. वरीलच्या संदर्भात सदर कर्जदारांना याद्वारे पुन्हा एकदा सूचित करण्यात येते की त्यांनी खाली नमूद रकमांचा सदर कर्जदारांनी निष्पादित केलेल्या इतर दस्तावेज/लेखांसह कर्ज करारांतर्गत देय असलेल्या खाली नमूद दिनांकापासून ते भरणा/वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या पुढील व्याजासह

सेवा गृह ऋण लिमिटेड यांचेकडे सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करावा. कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणून सदर कर्जदारांनी **सेवा गृह ऋण लिमिटेड** यांचेकडे पुढील मत्ता तारण म्हणून ठेवलेल्या आहेत.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांचे नाव	मागणी सूचना दिनांक व रक्कम
1	कर्ज क्र. H3CP000005003242 1. श्रीमती सीताबाई भैय्यालाल केवट, पतीचे नाव श्री भैय्यालाल केवट (कर्जदार) 2. श्री. भैय्यालाल बिसाऊ केवट, वडिलांचे नाव श्री. बिसाऊ केवट (सह-कर्जदार) 3. श्री. लखन भाऊराव भोयर, वडिलांचे नाव श्री. भाऊराव भोयर (सह-कर्जदार)	27-03-2025 31-01-2025 रोजी रु. 1,36,088/-
	अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता)- मौजा भेंडळा, ग्रामपंचायत भेंडळा, मालमत्ता क्र. 136, तहसील मौदा, जिल्हा नागपूर, महाराष्ट्र - 441104, तारण मालमत्तेच्या **चतु:सीमा:** पूर्वेस- पूर्वीचे लखन भोयर यांचे घर, पश्चिमेस- अशोक आखारे यांचे घर, उत्तरेस- अशोक आखारे यांची मोकळी जमीन, दक्षिणेस - रस्ता आणि शेत. **तारण मालमत्ता प्लॉटचे क्षेत्रफळ 512 चौ.फू.**	
2	कर्ज क्र. H3GP000005011252 1. श्रीमती तायरन झाएदली सय्यद, पतीचे नाव श्री. झाएदली सय्यद (कर्जदार) 2. श्री झाएद अली आमीर अली सय्यद, वडिलांचे नाव आमीर अली सय्यद (सह-कर्जदार) 3. श्री अनिस अली झाएद अली सय्यद वडिलांचे नाव श्री. झाएद अली सय्यद (सह-कर्जदार) 4. श्री. गणेश राजेश कागदे, वडिलांचे नाव श्री. राजेश कागदे (जामीनदार)	28-03-2025 31-01-2025 रोजी रु. 2,09,952/-
	अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता)- घर क्र. 317, गाव चांदोरी, तहसील भंडारा, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र. तारण मालमत्तेच्या **चतु:सीमा:** पूर्वेस- अजगर अली सय्यद यांचे पूर्वीचे घर, पश्चिमेस- भागवत विरूसकर यांचे घर, उत्तरेस- उत्तर रेकचंद शेंडे यांचे घर, दक्षिणेस - सीमेंट रोड, **तारण मालमत्ता प्लॉटचे क्षेत्रफळ 735 चौ.फू.**	
3	कर्ज क्र. L1GP000005010219 1. श्रीमती अलका मुकेश गणवीर, पतीचे नाव श्री. मुकेश गणवीर (कर्जदार) 2. श्री. राकेश मुकेश गणवीर, वडिलांचे नाव श्री. मुकेश गणवीर (सह-कर्जदार) 3. श्री. नीलेश मुकेश गणवीर, वडिलांचे नाव श्री. मुकेश गणवीर (सह-कर्जदार) 4. श्री. महेश प्रभू बावनकर, वडिलांचे नाव श्री. प्रभू बावनकर (सह-कर्जदार)	29-03-2025 31-01-2025 रोजी रु. 94,91,107/-
	अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता)- घर क्र. 187, मालमत्ता क्र. 202, गाव अंबाडी, तहसील भंडारा, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र. तारण मालमत्तेच्या चतु:सीमा: पूर्वेस- पौनी रोड, पश्चिमेस- अजय गणवीर यांचे घर, उत्तरेस- सुनील गणवीर यांचे घर, दक्षिणेस -सुगंधा रामटेकी यांचे घर, **तारण मालमत्ता प्लॉटचे क्षेत्रफळ 94.86 चौ.फू.**	
5	कर्ज क्र. L1GP000005001662 1. श्रीमती सुनीता दिवाकर चौधरी, पतीचे नाव श्री. दिवाकर चौधरी (कर्जदार) 2. श्री. दिवाकर फकिरा चौधरी, वडिलांचे नाव श्री. फकिरा चौधरी (सह-कर्जदार) 3. श्री. रोशन दिवाकर चौधरी, वडिलांचे नाव श्री. दिवाकर चौधरी (सह-कर्जदार) 4. श्री नितीश विनायक नेहरे, वडिलांचे नाव श्री. विनायक नेहरे (जामीनदार)	29-03-2025 31-01-2025 रोजी रु. 1,65,955/-
	अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता)- ग्रामपंचायत नंदीखेडा तिष्टी खुर्द, ग्रामपंचायत घर क्र. 357, मौजा तिष्टी खुर्द, तळेगाव, तहसील कळमेश्वर, नागपूर, महाराष्ट्र. तारण मालमत्तेच्या **चतु:सीमा:** पूर्वेस- लक्ष्मण सहारे यांचे पूर्वीचे घर, पश्चिमेस- वासुदेव निंबाळकर यांचे शेत, उत्तरेस- राजू आसोले यांचे घर, दक्षिणेस- रस्ता. **तारण मालमत्ता प्लॉटचे क्षेत्रफळ 1162 चौ.फू.**	

सदर कर्जदारांनी वर नमूद **सेवा गृह ऋण लिमिटेड** यांचेकडे भरणा न केल्यास. **सेवा गृह ऋण लिमिटेड** द्वारे सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) आणि लागू नियमांतर्गत वर नमूद मत्तांच्या विरुद्ध सदर कर्जदारांच्या खर्चाने व जबाबदारीवर कारवाई करण्यात येईल. सदर अधिनियमांतर्गत सदर कर्जदारांना **सेवा गृह ऋण लिमिटेड** यांच्या लेखी पूर्व-परवानगीशिवाय वर नमूद मत्तांची विक्री, भाडेपट्टी किंवा इतर मार्गांनी हस्तांतरण करण्यास मज्जाव करण्यात येत आहे, कुणाही व्यक्तीने सदर अधिनियम किंवा त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास ते कृत्य सदर अधिनियमांतर्गत केलेल्या तरतुदींतर्गत तुरुंगवास आणि/किंवा दंडास पात्र असेल.

स्थान: महाराष्ट्र — स्वा/- प्राधिकृत अधिकारी,
दिनांक: 15-04-2025 — सेवा गृह ऋण लिमिटेड करिता

Invitation for Appointment of
Project Management Consultant (PMC)
Shree Adinath Co-operative Housing Society Ltd,
Pune - Satara Road, Pune (Maharashtra) 411037

Invites reputed and experienced PMC for providing comprehensive services for the Redevelopment of its existing buildings of the society having an area of 54557 sq. mts. and 450+ members.

Mandatory Terms for Interested PMC firms :-

1) Experience of management of minimum 15 lac sq. ft building construction. 2) Minimum 5 years of experience in Redevelopment Segment. 3) Redevelopment experience of Min. 100 Members society.

RFP is Rs. 5000/- (Non-Refundable). Last date for submission is 9th May 2025 by 5.00 PM at the Society's Office.

The Society reserves the rights to accept or reject any or all RFPs without assigning any reason thereof. For any queries or clarifications, please email us at **shreeadinathsoc@gmail.com** or Contact below numbers.

Place : Pune Date : 21/04/2025	Chairman **Narendra Chhajed** **Mob :** 9822035971	Secretary **Vijay Navalakha** **Mob :** 9922100229

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

[Under Maharashtra Public Universities Act, 2016]
Phone No. 0217-2744770, Email-registrar@sus.ac.in

Ref.: Advertisement No.:
1) PAHSUS/Estab./TP-1/2024/212, dtd. 24/07/2024
2) PAHSUS/Estab./TP-1/2024/213, dtd. 24/07/2024
3) Extended date for submission of form Notification Ref. No. PAHSUS/Estab./2024/227, dtd. 27/08/ 2024.
4) Extended date for submission of form Notification Ref. No. PAHSUS/Estab./2024/247, dtd. 02/12/2024.

NOTIFICATION

It is hereby notified to all the concerned that the last date of submission of application forms for the posts of 1) Professor 2) Associate Professor as advertised vide above referred 1, 2, 3 & 4 is hereby extended up to 05/05/2025 (up to 5.00 p. m.).

All are therefore, requested to note that the last date of submission of form is Monday, 5th May, 2025 (up to 5.00 p.m.). The recruitment process will be as per the provisions of the Government Resolution dated 28/02/2025. Further details can be downloaded from the University website sus.ac.in under the link of Recruitment/Employment Opportunities.

Note : Candidates who have previously submitted applications, need not to apply again, but they can submit the additional documents.

Ref. No.: PAHSUS/Estt./2025/2925 — **Sd/-**
Date : 17 APR 2025 — **I/c Registrar**

GRIHUM HOUSING FINANCE Apna Ghar. Apni Pehchan.

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि.)
कॉर्पोरेट कार्यालयः सहावा मजला, बी बिल्डिंग, गंगा ट्रूनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र, 411014

परिशिष्ट IV (नियम 8(1) पाहावा)
ताबा सूचना
(अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे वरील कॉर्पोरेट / नोंदणीकृत कार्यालय असलेल्यागृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड जिचे नाव बदलून ते दि. 17 नोव्हेंबर, 2023 पासून गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड असे करण्यात आले आहे) (पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड आणि मुळात जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक कंपनी लिमिटेड या नावाने स्थापित) (यापुढे सदर अधिनियमानुसार सुरक्षित धनको असा उल्लेख करण्यात येईल) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे ''सदर अधिनियम'' असा उल्लेख करण्यात येईल) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद दिनांकास एक मागणी सूचना पाठवली ज्यात खालील कर्जदारांना सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सदर सूचनेत नमूद रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा न केल्याने याद्वारे कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **दि. 16 एप्रिल 2025** रोजी ताबा घेतलेला आहे.

कर्जदार व सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो सुरक्षित धनको यांच्या सदर रक्कम व तीवरील व्याजाच्या भाराधीन असेल.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते. ताबा घेण्यात आलेल्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	मालमत्तेचे वर्णन	ताबा घेण्याचा दिनांक	वैधानिक मागणी सूचनेचा दिनांक	मागणी सूचनेतील रक्कम रु.
1	जावेद खान अख्तर अली खान, साईमा अंजुम जावेद खान	जमीन शेत सर्वे क्र. 49/1/ए, प्लॉट क्र. 17, मौजे कासारखेड, क्षेत्रफळ सुमारे 123.97 चौ.मी., महानगर पालिका बालापूर यांच्या हद्दीत, तह. बालापूर, जिल्हा अकोला. मालमत्तेच्या **चतु:सीमा: पूर्वेस**- मदरसा, **पश्चिमेस**- रस्ता, **उत्तरेस**- शेख नाजीस यांचा प्लॉट, **दक्षिणेस** - हुदा शाळा.	16/04/2025	07/01/2025	कर्ज क्र. HL00601100000005017997 07/01/2025 रोजीनुसार देय असलेले रु. 944576/- (रुपये नऊ लक्ष चौरेचाळीस हजार पाचशे शहात्तर फक्त) सोबत वसुलीपर्यंतचे वार्षिक 14%दराने व्याज.

स्थानः नागपूर, दिनांकः 21.04.2025 — स्वा/- प्राधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, (पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि.)

TATA

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत पत्ताः 11वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई-400013
शाखेचा पत्ताः टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, दुसरा मजला, श्री आर्केड, घर क्र. 186, प्लॉट क्र. 130/19, रेड क्रॉस रोड, गांधी चौक, सदर, नागपूर-440001

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) व नियम 9(1) सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे आम जनतेस आणि कर्जदार/सह-कर्जदार किंवा त्यांचे कायदेशीर वारस/ प्रतिनिधी (कर्जदार) यांना सूचित करण्यात येते की **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.** (टीसीएचएफएल) यांचेकडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.** (टीसीएचएफएल) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी दि. 22-05-2025 रोजी ''जशी आहे जेथे आहे'' व ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथेच आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत व बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की विक्री पुढे ढकलण्यात/खंडित करण्यात न आल्यास, सदर अनामत मत्ता/मालमत्तेची दि. 22-05-2025 रोजी दु. 2 वाजता ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. ई-लिलावात सहभागासाठी बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट असलेला मोहरबंद लिफाफा 21-05-2025 रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत पर्यंत शाखेच्या पत्त्यावर म्हणजे टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, दुसरा मजला, श्री आर्केड, घर क्र. 186, प्लॉट क्र. 130/19, रेड क्रॉस रोड, गांधी चौक, सदर, नागपूर -440001 येथे टीसीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांकडे पोचावयास हवा.

अनामत मत्ता/ अचल मालमत्तेची विक्री ''जशी आहे जेथे आहे'' तत्त्वावर करण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/कायदेशीर वारस/कायदेशीर प्रतिनिधी/ जामीनदाराचे नाव	मागणी सूचनेनुसार रक्कम करार क्र.	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम	ताब्याचा प्रकार	थकबाकी रक्कम
1	TCHHF0275000100187726 & TCHIN0275000100188012	श्री. अजय विजय श्रीवास्तव श्रीमती निकिता उत्तमराव काळे	TCHHF0275000100187726 अंतर्गत देय रक्कम रु. 15,16,397/- (रुपये पंधरा लक्ष सोळा हजार तीनशे सत्याण्णव फक्त) आणि करार क्र. TCHIN0275000100188012 अंतर्गत देय रक्कम रु. 72,372/- (रुपये बाहत्तर हजार तीनशे बाहत्तर फक्त) म्हणजे एकूण रक्कम रु. 15,88,769/- (रुपये पंधरा लक्ष अठ्ठयाऐंशी हजार सातशे एकोणसत्तर फक्त) 05-02-2024	रु. 23,32,760/- (रुपये तेवीस लक्ष बत्तीस हजार सातशे साठ फक्त)	रु. 2,33,276/- (रुपये दोन लक्ष तेहत्तीस हजार दोनशे शहात्तर फक्त)	प्रत्यक्ष	करार क्र. TCHHF0275000100187726 अंतर्गत देय रक्कम रु. 1795505/- (रुपये सतरा लक्ष पंच्याण्णव हजार पाचशे पाच फक्त) आणि करार क्र. TCHIN0275000100188012 अंतर्गत देय रक्कम रु. 92625/- (रुपये ब्याण्णव हजार सहाशे पंचवीस फक्त) म्हणजे 14-04-2025 रोजी एकूण रक्कम रु. 1888130/- (रुपये अठरा लक्ष अठ्ठयाऐंशी हजार एकशे तीस फक्त)

अचल मालमत्तेचे वर्णनः- संपूर्ण आरसीसी बांधकाम सदनिका क्र. 210, बिल्ट-अप क्षेत्रफळ 54.180 चौ.मी. (583.194 चौ.फू.), दुसरा मजला, ब्लॉक क्र. एस-10, विंग-क ''रजत एन्क्लेव्ह'' या इमारतीत, यासह बिगर-शेती जमीन क्षेत्रफळ सुमारे 0.405 हेक्टर यात 0.885% अविभाजित हिस्सा व हितसंबंध, खसरा क्र. 202/1-ए (नवीन), मौजा झिंगाबाई टाकळी, प.ह.क्र. 11, बिगर-शेती जमीन क्षेत्रफळ सुमारे 0.405 हेक्टर, खसरा क्र. 202/1-बी (नवीन), मौजा झिंगाबाई टाकळी, प.ह.क्र. 11, मौजा झिंगाबाई टाकळी, सिटी सर्वे क्र. 461, शीट क्र. 552/72, नागपूर महानगर पालिका घर क्र. 744/डी/1-ए/एसएफ/210, वॉर्ड क्र. 61, झिंगाबाई टाकळी, कोराडी रोड, नागपूर, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, तहसील नागपूर आणि जिल्हा नागपूर.

लिलावाच्या वेळी सर्व लोकांना सामान्यपणे व्यक्तीशः बोली सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणारया अधिकारयास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री करण्यात येणारया मालमत्तेसाठी बोली देता किंवा काही हित साधता येणार नाही.

सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या तसेच पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईलः

सूचनाः मालमत्तांचा ई-लिलाव हा दिनांक 22-05-2025 रोजी दु. 2.00 ते 3.00 वाजेपर्यंत https://bankauctions.in/या पोर्टलच्या माध्यमातून घेण्यात येईल व यात प्रत्येकी 5 मिनिटांचे मर्यादित कालविस्तार असतील.

अटी व शर्तीः 1. खाली परिशिष्टात देण्यात आलेला तपशील निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून या घोषणेत काही चूक असल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार असणार नाहीत. बोलीची रक्कम अथवा बोलीदारासंदर्भात काहीही वाद निर्माण झाल्यास अचल मालमत्ता सुरक्षित धनकोच्या संमतीने पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **2.** सदर अचल मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. **3.** बोली वृद्धी रक्कम रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त) असेल. **4.** सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्तुत करण्यात येणारया सर्व बोली डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील ''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.'' यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या बयाणा रकमेसह सादर कराव्यात. बयाणा रकमेचा एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएस द्वारे भरणा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकारयांशी संपर्क साधावा. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल. **5.** सर्वोच्च बोलीदार बोली देण्यास पात्र असल्यास आणि त्याने प्रस्तुत केलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसल्यास त्यास यशस्वी बोलीदार घोषित करण्यात येईल. सर्वोच्च बोलीदाराने प्रस्तुत केलेली बोली रक्कम अत्यंत कमी वाटत असल्यास ती बोली फेटाळण्याचा अधिकार ''प्राधिकृत अधिकारयास'' असेल. **6.** नमूद केलेल्या कारणांसाठी विक्री बरखास्त करण्याचा/खंडित करण्याचा अधिकार ''प्राधिकृत अधिकारया''स असेल. **7.** आधीच वेळ घेऊन 14-05-2025 रोजी स. 11 ते सायं. 5 वाजेपर्यंत मालमत्तेची पाहणी करता येईल. **8.** यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी घोषणा करण्यात आल्यानंतर लगेच बयाणा रक्कम धरून खरेदी किमतीच्या 25 टक्के रक्कम ''प्राधिकृत अधिकारया''कडे 24 तासांच्या जमा करावी लागेल आणि ही रक्कम जमा न केल्यास सदर मालमत्ता पुन्हा लिलावात/खाजगी तहाद्वारे पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **9.** वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची रक्कम जमा करण्यात आल्यास खरेदी रकमेपैकी उर्वरित देय रक्कम खरेदीदारास मालमत्तेच्या विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत (विक्रीचा दिनांक सोडून) ''प्राधिकृत अधिकारया''कडे जमा करावी लागेल किंवा 15व्या दिवशी रविवार किंवा सुटीचा दिवस येत असल्यास त्यापुढील दिवशी जमा करावी लागेल. **10.** वर नमूद कालावधीत भरणा न केल्यास विक्रीची पुन्हा घोषणा करण्यात आल्यानंतर सदर मालमत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. तोवर भरलेली रक्कम टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड द्वारे जप्त करण्यात येईल अशी कसूर करणारया खरेदीदारास मालमत्तेवर किंवा पुढे त्या मालमत्तेची ज्या रकमेस विक्री करण्यात येईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा सांगता येणार नाही. **11.** मालमत्तेवरील टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना ज्ञात असलेले बोजेः वरील मालमत्तेच्या वर्णनात नमूद केल्याप्रमाणे. मालमत्तेवरील दावे आणि तिचे स्वरूप व मूल्य यावर परिणाम करू शकणारे इतर तपशीलः वर नमूद केल्याप्रमाणे. इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता कर, वीज बिल इ. सह वैधानिक देणी इ. सारख्या मालमत्तेवरील बोज्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी करावी. **12.** इतर कोणताही तपशील किंवा ई-लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार आमचे सेवा पुरवठादार मे. फोरक्लोजर, ब्लॉक क्र. 605 ए, सहावा मजला, मैत्रीवनम कमर्शियल कॉम्प्लेक्स, आमीरपेठ, हैदराबाद 500038, ईमेल: info@bankeauctions.com किंवा मनीष बन्सल, ईमेल आयडीः Manish.Bansal@tatacapital.com, प्राधिकृत अधिकारी मोबाईल क्र.: 8588983696 यांचे मार्फत संपर्क साधू शकतात. कृपया आपले प्रश्न, शंका 9999078669 या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावेत. **13.** सर्वोच्च घोषित करण्यात आलेल्या बोली रकमेवर सर्वोच्च बोलीदारास 1% दराने टीडीएस द्यावा लागेल. हा भरणा सर्वोच्च बोलीदारास मालक/ कर्जदाराच्या पॅनमध्ये करावा लागेल आणि चलन ची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावी लागेल. 14. वरील तपशीलासाठी सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर दिलेली https://surl.li//ngkrqj ही लिंक पाहावी. **15.** कृपया ही लिंकसुद्धा पाहावीः https://www.tatacapital.com/property-disposal.html

कृपया लक्षात घ्यावे की टीसीएचएफएल ने या मालमत्तेच्या विक्री/लिलावासाठी वर नमूद लिलाव भागीदाराशिवाय इतर कोणत्याही ब्रोकर/एजंटची नियुक्ती केलेली नाही. कृपया इच्छुकांनी या संदर्भातील कोणत्याही चौकशीसाठी केवळ निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारयांशी संपर्क साधावा.

स्थानः नागपूर — स्वा/-
दिनांकः 21-04-2025 — प्राधिकृत अधिकारी, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.